**<u>शपथेवर सरतपास सुरु–</u>**
**<u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. जी. जाधव यांचे मार्फत–</u>**

०८. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी वादीतर्फे नि.४ अ.क्र.४ वर दाखल खरेदीखताची सहीसुद नक्कल मान्य असल्याने त्यास निशाणी देणेबाबत हरकत नसल्याचे नमुद केले. सबब सदर खरेदीखतास **नि.२५** देण्यात आली. आता मला नि.४/२ वरील तक्रारीची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली. मी प्रतिवादी क्र.१ विरुध्द सावंतवाडी पोलीस ठाण्यात दिलेली हीच ती तक्रारीची प्रत आहे. ती मी ओळखते. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर बरोबर आहे. मुळ तक्रार प्रत सावंतवाडी पोलीस ठाण्यात दिलेली आहे. मुळप्रतीप्रमाणे यामधील मजकूर बरोबर आहे. तक्रारीच्या कार्यालयीन प्रतीस **नि.२६** देण्यात आली. आम्ही नोटरी ॲड. श्रीनिवास गवस यांचेकडे साठेखत केले होते. त्याची मूळ प्रत मी याकामी दाखल केली आहे. आता मला नि.४/३ वरील दि. १३/१२/२०१३ रोजीचे मुळ साठेखत दाखविण्यात आले. हे साठेखत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यासोबत मी केलेले आहे. हे साठेखत मौजे सांगेली येथील सर्वे क्र. ३८७/९/क या मिळकतीमधील हे. १–०५–०० आर. पोटखराब हे. ०–१७–०० आर. इतक्या क्षेत्राचे आहे. ही मिळकत रक्कम रु. २,००,०००/– इतक्या किंमतीस खरेदी देण्याचे ठरविले होते. मी खरेदीची ही पूर्ण रक्कम प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दिलेली आहे. आता मला हे साठेखत दाखविण्यात आले. त्यावर माझी आणि प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची सही आहे. साठेखतातील मजकूर बरोबर आहे. सदरचा साठेखत हे नोंदणीकृत नाही त्यामुळे त्याबाबत इंपाऊंड करण्याची आवश्यकता आहे की कसे हा मुद्दा ठरेपर्यंत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब ठेवण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2022.02.21 17:36:17 +0530

(श्रीमती आर आर बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दि. २१/०२/२०२२